महा मेट्रो

PUNE METRO

**स्वारगेट एस. टी. बस स्थानक व स्वारगेट मेट्रो स्थानक एकमेंकाशी जोडण्यासाठी भूमिगत पादचारी रस्त्यांचे बांधकामानिमित्त वाहतुकीत बदल**

**पुणे , १ सप्टेंबर २०२०** : पुणे मेट्रोचे काम पुणे आणि पिंपरी चिंचवड या शहरात वेगाने चालु आहे. स्वारगेट येथील मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट हब विकसित करण्याची जबाबदारी ही महामेट्रोला देण्यात आली आहे. यामध्ये स्वारगेट एस. टी. बस स्थानक व स्वारगेट मेट्रो स्थानक एकमेंकाशी जोडण्यासाठी भूमिगत पादचारी रस्त्यांचे बांधकामानिमित्त येथे वाहतुकीत बदल करण्यात येत आहे . या संदर्भात स्वारगेट एमएमटीएच स्टेशन आणि एमएसआरटीसी बस स्टँडला जोडणारा पूर्व भुयारी मार्ग बांधला जात आहे. यामुळे स्वारगेट मेट्रो स्थानक आणि स्वारगेट बस स्थानकाचे काम करताना प्रवाशांना त्रास सहन करावा लागणार नाही. तसेच स्वारगेट वरून कात्रज कडे किंवा इतर ठिकाणी जाण्यासाठी प्रवासी सहजगत्या प्रवास करू शकतात. या संदर्भात स्वारगेट या ठिकाणी स्वारगेट मल्टी मॉडल हब चे काम अधिक तत्परतेने करण्यासाठी स्वारगेट येथे प्रायोगिक तत्वावर तात्पुरते स्वरूपात वाहतुकीत बदल करण्यात येत आहे.

*** स्वारगेट जेधे चौकाकडुन सर्व्हिस रोडने कात्रजला जाणारी वाहतुक बंद करून सदरची वाहतुक फ्लॉय ओव्हर वरून व बीआरटी लेन मधुन व्होलगा चौक मार्गे कात्रजकडे जाईल.**

*** स्वारगेट जेधे चौकाकडुन येणाऱ्या बसेस यांना कात्रज व इतरत्र जाणेसाठी फ्लॉय ओव्हरच्या सुरवातीपासून ३० ते ४० मीटर अंतरावर फ्लॉय ओव्हरच्या खाली पी.एम.पी.एम.एल. बस थांबा करण्यात आलेला आहे. तरी इच्छित स्थळी जाणाऱ्या पी.एम.पी.एम.एल बसेस यांना बी.आर.टी. लेन मार्गे सदर पी.एम.पी.एम.एल बस थांब्याचा वापर करून इच्छित स्थळी जातील**

तरी वरील प्रमाणे वाहतुक बदलाबाबत वाहतुक पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे शहर वाहतुक शाखा व महामेट्रो यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

## आदेश

जा.क्र.अपोआ/वाहतुक/५११७ /२०२० पुणे शहर दिनांक ३१ /०८/२०२०

पुणे शहरातील स्वारगेट वाहतुक विभागाचे हद्दीत जेधे चौक येथे मेट्रो स्टेशनचे काम सुरु आहे. मेट्रो स्टेशन ते स्वारगेट एसटी बस स्थानकापर्यंत सबवेचे कामाकरिता दिनांक ३०/०८/२०२० रोजी पासुन पुढील आदेशापर्यंत प्रायोगिक तत्वावर वाहतुकीत बदल करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, वाहतुक ,पुणे शहर, त्या अनुषंगाने स्वारगेट वाहतुक विभागातील वाहतुकीत पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे प्रायोगिक तत्वावर तात्पुरते स्वरुपात बदल करण्यात येत आहे.

- **स्वारगेट जेधे चौकाकडुन सर्व्हिस रोडने कात्रजला जाणारी वाहतुक बंद करुन सदरची वाहतुक फ्लॉय ओव्हर वरुन व बीआरटी लेन मधुन व्होलगा चौक मार्गे कात्रजकडे जाईल.**
- **स्वारगेट जेधे चौकाकडुन येणा-या बसेस यांना कात्रज व इतरत्र जाणेसाठी फ्लॉय ओव्हरच्या सुरुवातीपासुन ३० ते ४० मीटर अंतरावर फ्लॉय ओव्हरच्या खाली पी.एम.पी.एम.एल बस थांबा करण्यात आलेला आहे. तरी इच्छित स्थळी जाणा-या पीएमपीएमएल बसेस यांना बीआरटी लेन मार्गे सदर पीएमपीएमएल बस थांब्याचा वापर करुन इच्छित स्थळी जातील.**

तरी वरील प्रमाणे वाहतुक बदलाबाबत वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

(डॉ. संजय शिंदे)
अपर पोलीस आयुक्त, वाहतुक
पुणे शहर.

PI 31.8

ACP